# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**<u>प्रेसनोट</u>** दिनांक १९/०५/२०२३

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा ”**

**“ स्वत:चे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणा-या दलालांवरती कारवाई करुन ०२ पिडीत महिलांची सुटका केली ”**

पिंपरी चिंचवड येथील स्पाचे नावाखाली काही दलाल स्वतःचे आर्थिक फायदयासाठी अवैध रित्या मुलींना स्पाचे नावाखाली जास्त पैशाचे अमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात. अशी गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त झाली.

त्यानंतर अशा दलाल व्यक्तींची गोपनीय माहिती काढून, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १८/०५/२०२३ रोजी सापळा रचून, बनावट ग्राहका करवी वेश्यागमनासाठी मुलींबाबत विचारणा केली असता, दलालाने सांगवी परिसरातील JASMINE FAMILY SPA सर्वे नं. ७१/१/२/६० मेन रोड, कृष्णानगर, नवी सांगवी, पुणे येथे अचानक छापा टाकला असता, आरोपी १) कुणाल राममुर्ती रेड्डी, वय ३९ वर्षे, रा. १९/३ नाईक चाळ, विटभट्टी जवळ, बोपोडी, पुणे मो. नं. ७०६६०९५९३७ २) **पाहिजे आरोपी महिला** यांच्या ताब्यातून दोन मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केलेली आहे. आरोपी क्र. १ यास ताब्यात घेवून सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २२९/२०२३ भादवि कलम ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सांगवी पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, विजय कांबळे, पोलीस अमंलदार, सुनिल शिरसाट, सुधा टोके, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, सागर सुर्यवंशी, वैष्णवी गावडे, संगीता जाधव, सोनाली माने यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड